# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर

# दिनांक 03/१२/२०२० (गुरुवार)

---

## कुही दुहेरी हत्याकांडाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे
## दोन आरोपींना अटक

पोलीस ठाणे कुही अंतर्गत मौजा डोंगरगाव शिवारात दिनांक १६/११/२०२० रोजी मृतक १) कुणाल सुरेश चरडे, वय २९ वर्षे, २) सुशिल बावणे, वय २७ वर्षे, दोन्ही रा. दिघोरी यांना धारदार शस्त्रांनी, सिमेंट कॉंक्रेटच्या पोलनी संपूर्ण शरीरावर अज्ञात कारणाने गंभीर जखमा करुन दुहेरी हत्याकांडाची घटना घडली होती. सदर प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने सहा तासांच्या आत उलगडा करुन १) राहुल श्रावणजी लांबट, वय २७ वर्षे, रा. भांडेवाडी, २) निशांत प्रशांतराव शाहाकर, वय २३ वर्षे, रा. खरबी रोड, नागपूर ३) जागेश्वर उर्फ बाहु संतोषराव दुधनकर, वय ३३ वर्षे, रा. नरसाळा ४) यश युवराज बुराडे, वय १९ वर्षे, रा. दिघोरी यांना अटक केली होती.

तपासादरम्यान घडलेल्या घटनेचा सुक्ष्मपणे विचार करता काही प्रत्यक्षदर्शी साक्षदारांची नावे समोर आली. साक्षदारांना विश्वासात घेवुन विचारपुस करण्यात आली. यावरुन गुन्हेगारी साम्राज्याचे वर्चस्व राखण्याच्या कारणावरुन नागपूर शहरातील दोन टोळ्यांमध्ये काही दिवसांपासुन टोळीयुद्ध सुरु होते. दोन्ही टोळ्यांमध्ये मतभेद होवुन १) राहुल श्रावणजी लांबट, वय २७ वर्षे, रा. भांडेवाडी, २) निशांत प्रशांतराव शाहाकर, वय २३ वर्षे, रा. खरबी रोड, नागपूर ३) जागेश्वर उर्फ बाहु संतोषराव दुधनकर, वय ३३ वर्षे, रा. नरसाळा ४) यश युवराज बुराडे, वय १९ वर्षे, रा. दिघोरी आणि त्यांचे काही सहकाऱ्यांनी दोन्ही मृतकांचे अपहरण करुन हत्याकांड केल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणाचे गांभीर्य पाहता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांनी सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडे तपास येताच गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींव्यतिरिक्त आणखी दोन आरोपींची वाढ झाली असुन दिनांक ०२/१२/२०२० रोजी १) योगेश विकास भिमटे, वय २१ वर्षे, रा. नरसाळा, २) वैभव विनायकराव कुकडे, वय २३ वर्षे, रा. दिघोरी यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केलेली आहे. त्यांना मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कुही यांचे न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने दिनांक ०५/१२/२०२० पर्यंत पोलीस कोठडी रिमांड दिलेला आहे. गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार हे करीत असुन आरोपींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

## अवैधरित्या देशी दारुची वाहतुक – स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही
## देशी दारुचे ३३ बॉक्स आणि बोलेरो पिकअप वाहनासह ४,४९,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त

पोलीस ठाणे उमरेड :– स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक ०२/१२/२०२० रोजी पोलीस ठाणे उमरेड अंतर्गत मौजा गांगापूर फाट्याजवळ केलेल्या कार्यवाहीमध्ये देशी दारुची अवैधरित्या वाहतुक करणारी महिंद्रा बोलेरो पिकअप पकडली. त्यात चालकास अटक करण्यात आली असुन त्याच्याकडुन एकुण ४ लाख ४९ हजार रुपये किंमतीचा मद्देमाल जप्त करण्यात आला.

गौतम वामन काटकर, वय २३ वर्षे, रा. माजरी, ता. भद्रावती, जिल्हा चंद्रपूर असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार वरिष्ठांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस ठाणे उमरेड हद्दीत गस्त करित असता गोपनिय सुत्रांकडुन मकरधोकडा उमरेड रोडने महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. एमएच ४९/डी १३०३ मध्ये मोठ्या प्रमाणात मद्यसाठ्याची अवैधरित्या वाहतुक होणार असुन सदरहु वाहन दारुबंदी असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात जाणार असल्याबाबत विश्वसणीय माहिती प्राप्त झाली. त्यानुसार मौजा गांगापुर फाट्याजवळ नमुद पथकाने नाकाबंदी लावुन उमरेडच्या दिशेने येणाऱ्या बोलेरो पिकअप क्र. एमएच ४९/डी १३०३ तपासणी केली असता वाहणाचा डाला रिकामा आढळुन आला. परंतु डाल्याचेवर लाकडी पाट्या लागलेल्या असुन त्यावर ताडपत्री झाकुन असल्याचे लक्षात येताच सदर भागाच्या तपासणी दरम्यान ताडपत्रीच्या आत एकुण ९९ हजार रुपये किंमतीचे रॉकेट देशी दारुच्या सिलबंद शिशांनी भरलेले ३३ बॉक्स (३,३०० शिशा) अवैधरित्या विनापरवाना मिळून आले. यावरुन वाहण चालक गौतम वामन काटकर याचेकडुन देशी दारु व वाहणासह एकुण ४ लाख ४९ हजार रुपये किंमतीचा मद्देमाल जप्त करुन त्याचेविरुद्ध पोलीस ठाणे उमरेड येथे कलम ६५ (अ) (ई) महा. दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस हवालदार रमेश भोयर, पोलीस शिपाई राधेशाम कांबळे, बालाजी साखरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

टिप :– सदर कार्यवाहीचे छायाचित्र खालीलप्रमाणे.



## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

पोलीस ठाणे कळमेश्वर :– अंतर्गत दिनांक २७/११/२०२० चे १७.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान मौजा ब्राम्हणी येथिल फिर्यादी महिलेची ०४ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही आजीकडे एकटी जात असतांना पियुश परितोष रॉय, वय २३ वर्षे, रा. गोंडखैरी रोड (झोपडपट्टी) याने अल्पवयीन मुलीस शेवचे पाकिट व पैशाचे आमिष दाखवुन एका घराचे बाजुला नेले आणि अभद्र (अश्लील) व्यवहार केला. सदरची बाब कोणालाही न सांगण्याबाबत धमकावले. सदर प्रकरणी पियुश परितोष रॉय यास अटक करुन त्याचे विरुद्ध पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ३५४, ३५४(ब), ५०६ भादंवि सहकलम ७, ८, ९ (एम) बालकांचे लैगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक सोनाली रासकर, नेमणुक पोलीस ठाणे सावनेर या करीत आहेत.

## अपघातात मृतु

पोलीस ठाणे खापा :– अंतर्गत दिनांक०२/१२/२०२० रोजी १३.३० वा. दरम्यान मौजा खापा ते सावनेर रोडने जात असता जिजा माता शाळेजवळ फिर्यादी गोपाल हरिचंद्र भलावी, वय २८ वर्षे, रा. अंबाझारी, ता. पारशिवनी हे त्यांचे नातेवाईकांसोबत आपले मोटार सायकलने ट्रिपल सिट सावनेतला जात असतांना ट्रक क्र. एमएच ४०/बीएल ६९०१ च्या चालकाने आपला ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक मारल्याने झालेल्या अपघातात फिर्यादीचे नातेवाईक आकाश नत्थुजी करकाम, वय ३९ वर्षे हे गंभीर जखमी होवून जागीच मरण पावले. सदर प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध पोलीस ठाणे खापा येथे कलम २७९,३३७,३३८, ३०४ (अ) भादवी सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री झांबरे हे करीत आहेत.